
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020- 25657878 फॅक्स क्र. 020- 25674641
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in संकेतस्थळ
www.puneruralpolice.gov.in



निविदा जाहिरात - नवीन कामे : वर्ष २०२५-२०२६

जा.क्र. नोंशा/प्रबंधक/कोरेगाव भिमा २०२६ /२०२५ पुणे, दिनांक /१२/२०२५

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या आस्थापनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षी दिनांक ०१/०१/२०२६ रोजी मौजे पेरणे फाटा, ता- हवेली फाटा, ता- हवेली, जि- पुणे येथे पार पडणा-या कोरेगाव भिमा विजयस्तंभ शौर्य दिन साजरा करण्याकरिता प्रशासकीय सोयीसाठी निविदा पध्दतीने पुरवठादार/ निविदाकार यांचे पुढील कामकाजाची किमान दरात सेवा उपलब्ध करून घेणेकामी बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा क्रमांक	कामाचे नाव	अंदाजित पुर्व गणित रक्कम रू.
SPPUNER/ CCTV /2025_5	१६५ नग सीसीटिव्ही सेवा भाडेतत्वावर उपलब्ध करून देणेबाबत..	4,70,000/-

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र. ८/उद्योग-४, दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये दरपत्रकाचे आधारे वरील सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

तरी सदर दरपत्रके/ निविदा व स्विकृती उघडण्याची कार्यवाही कालावधी हा पुढीलप्रमाणे राहील.

निविदा फॉर्म/ दरपत्रके सादर करणेची दिनांक	-	दिनांक २२/१२/२०२५ सकाळी १०.३० वा ते दिनांक २६/१२/२०२५ दुपारी १२.०० वाजेपर्यत.
निविदा फॉर्म/ दरपत्रके स्विकृतीचा अंतिम दिनांक	-	२६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत
निविदा फॉर्म/ दरपत्रके उघण्याचा दिनांक	-	२६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता (शक्य झाल्यास)

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असुन सदर कामांचे निविदा संच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) निविदा संच हा शेवटच्या दिवशी प्राप्त न झाल्यास सेवा पुरवठादार/ ठेकेदारांची पुनश्च नव्याने निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी अंदाजित पुर्व गणित रक्कम दर्शविल्याप्रमाणे लिफाफ्यामध्ये रक्कम कमी दराने रेट कोट करावयाचा आहे. दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा जादा दराने रेट कोट करण्यात आलेली निविदा बाद समाजवण्यात येईल.

क) महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

ड) सदर निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबधितानी वेबसाईटला भेट देवुन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखुन ठेवलेले आहेत.

इ) अनुदान अभावी निविदा रदद झाल्यास निविदाकार यांनी सादर केलेली निविदा शुल्क/सादर कागदपत्रे परत करणेबाबत कार्यालय कसल्याही प्रकारची हमी देत नाही.

ई) निविदाकार यांनी बंध लिफाफ्यामध्ये दरकोटेशन लेटर हेड वर दयावे तसेच या निवीदेत सादर करण्यात आलेला (नमुना फॉर्म-१) भरून सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निविदाकार एल-१ ठरल्यावर नमुना फॉर्म-१ मधील सर्व कागदपत्रांचा संच कार्यालयानी पुरवठा आदेश दिल्यानंतर जमा करावे लागेल.

जी) तरी तांत्रिक दृष्टया पात्र असणा-या निविदाकार दरपत्रके बंद पाकिटात खरेदी समिती समक्ष सादर करणेची दक्षता घ्यावी.

मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे मान्यतेने

22/12

(दिलीप शिंदे)
पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.).,
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

प्रति, सर्व मेसर्स,

प्रत प्रसिध्दीकामी :- पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण